अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड






# दादांचा 'ऑप्शन' जयाभाऊंचे 'ओपिनियन' देवाभाऊंची 'कॅप्शन'!

## झेडपीचा कारभारी 'फायनल'

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सर्वच आघाड्यांवर राहिलेली भाजपची बलाढ्य ताकद आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी राबवलेली धडाकेबाज यशस्वी रणनिती या जोरावर सोलापूर जिल्हा परिषदेत या पक्षानं ३८ जागा मिळवत आपलं निर्विवाद वर्चस्व आणल्यानंतर आता अध्यक्ष कोण होणार? याची खलबंत पडद्याआड वेगानं सुरु झाल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे.आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून अध्यक्षपदाचं नाव निश्चित होणार आहे.दरम्यान अध्यक्षपदाच्या निवडीत ओबीसी' प्रवर्गातून निवडून आलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील रामप्पा चिवडशेट्टी (वळसंग गट) आणि श्रृती भोरगुंडे (कुंभारी गट) त्याशिवाय बार्शी तालुक्यामधून भारती दराडे (उपळे दुमाला गट), दुर्गाताई अंकुशराव (गोपाळपूर गट) आणि उत्तर सोलापूर तालुक्यातून चैत्राली मुळे (नान्नज गट) यांची नावेदेखील अध्यक्षपदाच्या रेसमध्ये भाजप श्रेष्ठींच्या समोर सर्वाधिक आघाडीवर आहेत. अध्यक्षपदाच्या रेसमधील चेहऱ्यांपैकी कोणता चेहरा या पदासाठी सक्षम आहे, त्याशिवाय या तालुक्यामधील भाजपची स्थिती आणि गती, इथलं नेतृत्व, भाजपच्या पाठिशी मतदारांनी निवडणुकांमध्ये लावलेली सर्वाधिक ताकद या निकषांचादेखील विचार अध्यक्षपदाच्य निवडीवेळी होणार असल्याची अत्यंत खात्रीलायक माहिती आहे.**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचं या खेपेचं आरक्षण इतर मागासवर्ग म्हणजे ओबीसी प्रवर्गासाठी राखीव आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी जिल्हा परिषदेच्या एकूण ६८ गटांपैकी १८ जागा या ओबीसी प्रवर्गासाठी राखीव होत्या. त्यामध्ये ९ महिला आणि ९ पुरुष अशी समसमान विभागणी होती. भाजपच्या उमेदवारीवर या प्रवर्गाचे ७ चेहरे निवडून आले आहेत. हे अध्यक्षपदाच्या सिंहासनाचे दावेदार आहेत. प्रबळ दावेदारांचा विचार करता अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अर्धांगिणी शांभवी कल्याणशेट्टी, रामप्पा चिडशेट्टी, श्रृती भोरगुंडे, दुर्गा अंकुशराव,भारती दराडे यांचं पारडं अध्यक्षपदाच्या निवडीसाठी जड असल्याची माहितीदेखील मिळाली आहे. अक्कलकोट, बार्शी, पंढरपूर आणि दक्षिण सोलापूर या चार तालुक्यातून जिल्हाध्यक्षपदावर सक्षम चेहरा आणण्याचा भाजप श्रेष्ठींचा अजेंडा असल्याचं सांगण्यात आलं.

विशेषत्वे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा 'होल्ड' अध्यक्षपदाच्या निवडीवेळी राहणार आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्ह्यातील ११ नगरपरिषद आणि अनगर नगरपंचायत तसेच महत्त्वाच्या सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत त्यांनी दिलेलं योगदान किंबहुना सोलापूर जिल्ह्यात भाजपचा विस्तार होण्यात त्यांची यशस्वी ठरलेली रणनिती व उमटलेलं प्रभावी प्रतिबिंब यामुळं कल्याणशेट्टी सांगतील त्याप्रमाणं जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडीवेळी त्यांच्या शब्दाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून मान दिला जाऊ शकतो, असं भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून सांगण्यात आलं.

उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नजच्या राष्ट्रवादीच्या गटाला सुरुंग लावून भाजपनं पहिल्यांदा इथली जागा आपल्या पक्षाकडं घेतली आहे. या जागेसाठी ओबीसी प्रवर्गाचं आरक्षण होतं. चेताली मुळे यांच्याकडं जरांगे फॅक्टर ओबीसी मराठा प्रवर्गाचं प्रमाणपत्र आहे. त्या आधारे त्यांनी निवडणूक लढवली आहे.या पदावर मराठा चेहरा देण्याचा विचार झाल्यास चेताली मुळे या जिल्हाध्यक्षपदाच्या दावेदार ठरु शकतात, अशी माहिती देण्यात आली. चेताली मुळे यांच्यासह निवडून आलेल्या अन्य काही विजयी उमेदवारांकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचंदेखील कळतं. त्यांनी जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी पालकमंत्री जयकुमार गोरेंकडे लॉबिंग सुरु ठेवल्याचं कळतं.

### संस्कृती सातपुतेंना पाच स्टॅंडिंगमध्ये संधी देण्याचा भाजप श्रेष्ठींचा विचार



माळशिरसचे माजी आमदार राम सातपुतेंच्या अर्धांगिनी उच्च शिक्षित चेहरा दहिगाव जिल्हा परिषद गटाच्या विजयी उमेदवार संस्कृती सातपुते यांना जिल्हा परिषदेमधील पाच स्टॅंडिंगमध्ये प्राध्यानाने संधी देण्याचा भाजप श्रेष्ठींचा विचार असल्याची माहितीदेखील आहे. राम सातपुते यांचं पक्षासाठी योगदान लक्षात घेतलं जाणार आहे.

### कल्याणशेट्टी यांच्याबाबतीत काय होईल? भाजप श्रेष्ठींनी 'हे' सरळसरळ सांगितलं...



सोलापूर जिल्ह्यात भाजप वाढवण्यात आमदार सचिन कल्याणशेट्टींचं आजवर प्रत्येक आघाड्यांवर राहिलेलं योगदान पाहता ते मंत्रीपदाच्या रेसमध्ये आहेत. त्यांची तशी महत्त्वकांक्षा असणंही काही गैर नाही. मंत्रीपद की जिल्हाध्यक्ष असे दोन पर्याय त्यांच्यापुढं पक्षाकडून ठेवले जाऊ शकतात. मंत्रीपदाचा 'लाल' दिवा की राज्यमंत्रीपदाचा दर्जा असलेलं सोलापूर जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद या दोन्ही पर्यायापैकी जिल्हाध्यक्ष पदाचा पर्याय त्यांनी निवडला तर अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव गटातून तब्बल १६ हजार २३८ मतं आणि विरोधी उमेदवारापेक्षा ७ हजाराचं मताधिक्य घेऊन निवडून आलेल्या त्यांच्या सौंभाग्यवती शांभवी कल्याणशेट्टी यांच्या नावावर जिल्हाध्यक्षपदाची मोहर उमटवली जाऊ शकते.

### सचिनदादा अन् जयाभाऊ ठरवणार; देवाभाऊ 'ओके' म्हणून 'सिग्नल' देणार

मुख्यत्वे, सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपद, उपाध्यक्ष आणि विविध समित्यांचे सभापती निवडण्याच्या संदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दोघे सर्वच आघाड्यांवर विचार करुन नावं फायनल करतील. संबंधित नावांची यादी हे दोघे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दाखवून निवडीसंबंधी काय निकष लावले ते सांगतील. त्यांनतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून निवडीसंबंधीच्या नावांना ग्रीन' सिग्नल मिळेल. फडणवीस हे फायनल झालेल्या अध्यक्षपदाचं नाव घोषित करतील अशीदेखील शक्यता असल्याचं सांगण्यात आलं.

### पालिकेच्या महापौर, गटनेता निवडीचा पॅटर्न; अध्यक्षपदाच्या निवडीत राबवला जाऊ शकतो

सोलापूर महापालिकेच्या महापौर पदावर विनायक कोंड्याल यांना निवडताना त्यांची चार टर्म निवडून येण्याची ज्येष्ठता, या खेपेस सर्वाधिक घेतलेली मतं, सामाजिक संतुलन आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी तब्बल ४४ नगरसेवक निवडून आणण्याची दाखवलेली झलक या निकषांवर कोंड्याल यांना महापौर पदावर संधी दिली. तसेच अनुभवी, निष्ठावंत आणि सोलापूर भाजप वाढवण्यात दिलेलं योगदान हे लक्षात नरेंद्र काळे यांना महापालिकेच्या गटनेतेपदावर निवडलं गेलं. कोंड्याल आणि काळे हे जुने चेहरे नव्यानं निवडतानाच उपमहापौर पदावर ज्ञानेश्वरी देवकर या अत्यंत नवख्या चेहऱ्याला संधी दिली. त्याशिवाय महापालिकेतील स्थायी समिती, परिवहन समिती, महिला व बालकल्याण समिती, स्थापत्य या महत्त्वाच्या समित्यांवर संधी देताना अन्य समित्यांवरदेखील पक्षाच्या नगरसेवकांना भाजप संधी देणार आहे. तोच पॅटर्न जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवेळी घेतला जाऊ शकतो. वळसंग गटातून निवडून आलेले रामप्पा चिवडशेट्टी हे ज्येष्ठ आहेत. ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिती इथल्या त्यांच्या कामाचा अनुभव आणि ज्येष्ठत्व याचा विचार करता त्यांनी जिल्हा परिषदेच्या कारभारी पदावर संधी मिळू शकते, असं सांगण्यात आलं. त्याशिवाय दक्षिण तालुक्यात भाजपची वाढलेली ताकद लक्षात घेता, आमदार सुभाष देशमुखांचा आग्रह विचारात घेता किंवा त्यांच्या नेतृत्वाची कदर करताना ओबीसी चेहरा म्हणून कुंभारी गटातून ९,७४४ मतं घेत विजयी झालेल्या श्रृती भोरगुंडे यांचा विचार निश्चितपणे होऊ शकतो.

### राजाभाऊंच्या नेतृत्वाची निश्चित होणार कदर

### अध्यक्षपद-उपाध्यक्षपदासह समित्या बार्शीसाठी 'चॉईस'

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत बार्शी तालुक्यात माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली भाजपनं मुसंडी मारली. जिल्हा परिषदेच्या ६ आणि पंचायत समितीच्या १२ अशा सर्वच गटांवर या पक्षाची हुकमत आली आहे. विशेषत्वे, या तालुक्याच्या पंचायत समितीवर तब्बल पाचव्यांदा त्यांनी निर्विवाद वर्चस्व आणलं आहे. त्यामुळं राऊत यांच्या नेतृत्वाची भाजप श्रेष्ठींकडून निश्चितपणे तोलामोलानं कदर केली जाणार आहे. उपळे दुमाला गटातून १५ हजार ५२५ मतांनी विजयी झालेल्या भारती दराडे या ओबीसी चेहऱ्याचं नाव अध्यक्षपदासाठी ते निश्चितपणे पुढं करु शकतात. भाजपला निर्विवादपणं जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सर्व जागांवर मिळालेलं दणदणीत यश हा जर निकष श्रेष्ठींकडून लावण्यात आला तर जिल्हाध्यक्षपद बार्शी तालुक्याला जाऊ शकतं. कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपरिषद आणि पुन्हा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या सर्व निवडणुकांमध्ये भरभरून देणाऱ्या बार्शीकरांच्या पुड्यात जिल्हाध्यक्षपद टाकलं जाऊ शकतं. या तालुक्याला या पदावर न्याय मिळालेला नाही, तो बॅकलॉकसुद्धा भाजप भरुन देऊ शकतं. त्याशिवाय बार्शी तालुक्याला जिल्हाध्यक्षपद देण्यात अडचण तरी अध्यक्षपदावर सर्वसामन्य चेहरा देताना उपाध्यक्षपदावर खमका आणि अध्यक्षांना सोबत घेऊन जाणारा चेहरा हा बार्शी तालुक्यातून राजेंद्र राऊत यांच्या मर्जीनुसार दिला जाऊ शकतो. त्याशिवाय पक्षाला या तालुक्यात मिळालंलं यश पाहता शिक्षण, महिला व बालकल्याण अशा महत्त्वाच्या पाच स्टॅंडिंगमध्ये पदं देऊन बार्शी तालुक्याला न्याय देण्याचा निश्चित विषय होणार, असंदेखील भाजपच्य वरिष्ठ नेत्यांनी 'सुराज्य' खात्रीलायकरित्या सांगितलं.



# १२ वी इंग्रजी पेपरमध्ये मोठा गैरप्रकार उघड

## १९ पर्यवेक्षकांवर कारवाई

## सीसीटीव्हीमुळे फसवणूक उघड

✔ छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

जिल्ह्यातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर (ता. कन्नड) येथे इयत्ता १२ वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान मोठा गैरप्रकार उघडकीस आला आहे. परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल १९ पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

दक्षता समितीचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि विभागीय बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने संपूर्ण तपास पूर्ण केला.

### सीसीटीव्ही फुटेजमधून गैरप्रकार उघड

दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या इंग्रजी परीक्षेदरम्यान काही विद्यार्थी एकमेकांच्या उत्तरपत्रिकांकडे पाहून नक्कल करत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावरील उउढत फुटेजची सखोल तपासणी करण्यात आली. फुटेजमध्ये विद्यार्थ्यांच्या हालचाली स्पष्ट दिसून आल्या असून, गैरप्रकार सिद्ध झाल्याने प्रशासनाने तत्काळ कारवाई केली.



छत्रपती संभाजीनगर : सामुहिक कॉपी करताना परीक्षार्थी.

### प्रशासनाचा स्पष्ट संदेश

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर आणि विस्तार अधिकारी सिताराम पवार यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईतून परीक्षा प्रक्रियेत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. सीसीटीव्ही यंत्रणेमुळे प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जात असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा बसणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### परीक्षा केंद्राचा संपूर्ण स्टाफ बदलला

गैरप्रकाराची गंभीरता लक्षात घेता परीक्षा केंद्रावरील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे. पुढील सर्व परीक्षा शिस्तबद्ध आणि नियमानुसार पार पडाव्यात यासाठी नव्याने नियुक्त कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. उपरवाला सब देख रहा है या म्हणीचा प्रत्यय देणारी ही कारवाई असल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

### १९ जणांविरुद्ध कठोर कारवाई प्रस्तावित

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक आणि तिथल्या पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांनी केलेले 'प्रॉमिस' ते नेहमी विसरतात !

कल्याण
479-00-244

मुंबई
134-80-389